जा.क्र. माध्य.३(   )/प्रथम मान्यता/पुवि/२००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 8 JUN 2001

विनाअनुदान तत्वावर मान्यता

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : प्रथम मान्यता. . .
शाळा माध्यमिक विद्यालय, सुतारवाडी, पाषाण

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक : शिक्षण/माध्य/ई-४/प्रमा/२०००-२००१, दि. १५.५.२००१
२. या कार्यालयाचे जा.क्र. माध्य-३/९३/नशाशा मान्यता/पुवि/२००१, दि. ८.३.२००१
३. शासनपत्र क्र. नमाशा/[४३०/२००० माशि-२, दि. ३१.८.२०००

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये ~~संस्कार मंदिर संस्थे~~ संस्थेच्या माध्यमिक विद्यालय, सुतारवाडी पाषाण माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/९ वी व १० वी च्या वर्गास २०००-२००१ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटोंची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटोंची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. **शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.**
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. शिक्षक पालक संघाची स्थापना करावी.
१५. कर्मचा-यांची सेवानोंद पुस्तके ठेवावीत.

स्वाक्षरीवर शि. उ. सं. यांची
सही आहे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : १. मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, सुतारवाडी पाषाण पुणे-४११०२१.
२. निवडनस्ती.